महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५८ वे | दिनांक : ०३/०६/२०२६ | वार : बुधवार

## ओबीसींचा स्वतंत्र कॉलम नाही, तर जनगणनेवर बहिष्कार

**भंडारा :** पुढच्या पिढीचे भविष्य आणि सामाजिक न्याय हवा असेल, तर आज एकत्र यावेच लागेल, हाच निर्धार मनात ठेवून भंडारा जिल्ह्यातील तब्बल 50 ग्रामपंचायतींच्या सरपंचांनी प्रशासकीय दबावाला झुगारून ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. "आगामी जनगणनेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम नसेल, तर संपूर्ण गावातून जनगणनेवर बहिष्कार टाकला जाईल," असा आक्रमक आणि रोखठोक पवित्रा सरपंचांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्यासमोर घेतला.

आज उपविभागीय कार्यालय, भंडारा येथे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत जवळपास 50 ग्रामपंचायतींचे सरपंच, प्रशासक आणि नागरिकांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला गुंथारा गावातून सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी सरपंचांना जनगणनेवरील बहिष्कार मागे घेण्याची वारंवार विनंती केली. मात्र, सरपंच संघटनेने प्रशासकीय दबावाला बळी न पडता, ओबीसी हिताला प्राधान्य देत आपला निर्णय कायम ठेवला. ग्रामीण भागातील महिला सरपंच आणि काही कमी शिक्षित सरपंचांनी ज्या हिमतीने आणि सामाजिक जाणीवेतून प्रशासनाचा विरोध पत्करला, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्वतःच्या पदाचा आणि अधिकाराचा वापर समाजाच्या हक्कासाठी कसा करावा, याचे एक उत्तम उदाहरण या लोकप्रतिनिधींनी घालून दिले आहे.

एकीकडे ग्रामीण भागातील कमी शिकलेले सरपंच आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्यासाठी रस्त्यावर उतरून लढा देत असताना, दुसरीकडे मात्र समाजातल्या एका सुशिक्षित वर्गाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांची खरी शोकांतिका अशी आहे की, स्वतःला शहाणे समजणारे आणि उच्च पदांवर बसलेले ओबीसी अधिकारी वर्ग मात्र पाय वर करून हा तमाशा उघड्या डोळ्यांनी बघत आहेत. या संपूर्ण प्रवासात आतापर्यंत एकाही ओबीसी अधिकारी किंवा विद्यार्थ्यांचा सादा कॉलही आलेला नाही. नोकरीत असताना जातीचा फायदा घ्यायचा, अडचण आली की ओबीसी संघटनांची मदत घ्यायची, पण जेव्हा समाजाच्या हक्काची चळवळ उभी राहते, तेव्हा हे अधिकारी कुठेच दिसत नाहीत.

भंडारा जिल्ह्यातील या सरपंचांनी घेतलेला हा निर्णय आता संपूर्ण राज्यभरात ओबीसी आंदोलनाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. अधिकाराच्या खुर्चीवर बसून सुस्त राहिलेल्या अधिकाऱ्यांपेक्षा, जमिनीवर राहून समाजासाठी लढणारे हे सरपंच खऱ्या अर्थाने समाजाचे नेते ठरले आहेत. जोपर्यंत ओबीसींच्या हक्काचा स्वतंत्र कॉलम जनगणनेत समाविष्ट केला जात नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशारा सरपंच संघटनेने दिला आहे.

## मुंबई पोलिसांची गुजरातमध्ये मोठी कारवाई : ७४ कोटींचा एमडी ड्रग्ज जप्त





**मुंबई :** देशभरात अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याविरुद्ध पोलिसांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. मुंबईतील साकीनाका पोलिसांनी एका आंतरराज्यीय ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश करत थेट गुजरातमध्ये धडक कारवाई केली आहे. नर्मदा जिल्ह्यातील राजपिपला येथे सुरू असलेला 'एमडी' (मेफेड्रॉन) ड्रग्जचा कारखाना उद्ध्वस्त करून पोलिसांनी ७४ कोटी ७६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ एप्रिल २०२६ रोजी अंधेरी-घाटकोपर लिंक रोडवर १०९ ग्रॅम मेफेड्रॉनसह मुस्कान समीर खान (२६) हिला अटक करण्यात आली होती. तिच्याकडे झालेल्या कसून चौकशीतून गुजरातमध्ये ड्रग्ज निर्मितीचा कारखाना सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. या माहितीच्या आधारे साकीनाका पोलिसांच्या पथकाने नर्मदा जिल्ह्यातील नांदोद तालुक्यातील वरखड गावात छापा टाकला.

या रॅकेटचा दुसरा सूत्रधार वजूळ कमर अबुल वफा चौधरी उर्फ पप्पू (५६) याला शिळफाटा येथून ताब्यात घेण्यात आले होते. त्यानेच गुजरातमध्ये घर भाड्याने घेऊन तिथे ड्रग्ज निर्मितीची प्रयोगशाळा सुरू केली होती. छाप्यात पोलिसांनी २० किलोहून अधिक लिक्विड मेफेड्रॉन जप्त केले, ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत किंमत सुमारे ७४.४६ कोटी रुपये आहे. यासोबतच मोठ्या प्रमाणात घातक रसायने, कमर्शिअल फ्रीज, मशिनरी आणि इतर तांत्रिक साहित्यही जप्त करण्यात आले आहे.

दुसरीकडे, सातारा जिल्हा पोलिसांनीही अमली पदार्थ विरोधी मोहिमेत यश मिळवले आहे. स्थानिक गुन्हे शाखा आणि फलटण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ४ किलो ६९ ग्रॅम गांजा हस्तगत केला. या कारवाईत गांजासह एक दुचाकी आणि दोन मोबाईल जप्त करण्यात आले असून, एकूण २ लाख १ हजार ७२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अमली पदार्थांमुळे तरुण पिढी बरबाद होत असून ही तस्करी रोखण्यासाठी पोलीस कटिबद्ध आहेत. मुंबई पोलिसांच्या या कारवाईमुळे गुजरात ते महाराष्ट्र पसरलेले मोठे रॅकेट उघड झाले असून, आगामी काळात आणखी काही बडे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कामगारांच्या धोरणात्मक आणि कायदेशीर मागण्यांवर शासन सकारात्मक

**मुंबई :** राज्यातील कामगारांच्या विविध प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सिटू) संघटनेच्या प्रतिनिधींसमावेत मंत्रालयातील दालनात बैठक पार पडली. या बैठकीत कंत्राटी, बांधकाम, घरकामगार, अंगणवाडी व आशा कर्मचाऱ्यांसह विविध घटकांच्या प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस संघटनेचे प्रतिनिधी आबासाहेब चौगुले, धर्मा कांबळे, अशोक थोरात, किरण मोघे आदी उपस्थित होते.

यावेळी विविध उद्योग क्षेत्रांतील असंघटित कामगारांच्या प्रश्नांचे पुनरावलोकन, किमान वेतन सल्लागार मंडळाची स्थापना, कंत्राटी कामगारांचे प्रश्न, समान वेतन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, विविध उद्योगांसाठी किमान वेतन निश्चिती, सफाई तसेच घरकामगारांसाठी स्वतंत्र धोरण, तसेच अंगणवाडी व आशा कर्मचाऱ्यांना विविध सामाजिक सुरक्षा लाभ उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री आकाश फुंडकर यांनी शासन कामगार कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. बांधकाम कामगार नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सध्या 41 पथके कार्यरत असून तपासणी सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. आधार संलग्नीकरणाची प्रक्रिया वेगाने राबविण्यात येत असून पात्र घरकामगारांना संबंधित योजनांचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील कामगारांसाठी कल्याणकारी उपाययोजनांना अधिक बळकटी देण्यासाठी जुलै अखेरपर्यंत संबंधित कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यातील विविध कामगार घटकांच्या मागण्या आणि प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करून, आवश्यक ती पडताळणी पूर्ण झाल्यानंतर शासन स्तरावर योग्य ते धोरणात्मक निर्णय घेण्यात येतील. कामगारांच्या हिताचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन सकारात्मक असून यासाठी सर्व संबंधित घटकांशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात येईल, असे ॲड. फुंडकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६


# अलक : ८ अति लघु कथा - डॉ. सुधीर राजाराम देवरे

अंत्यसंस्कारांचे कार्यक्रम त्याचा मुलगा मित्राच्या शेततळ्यात पोहायला गेला होता. बुडून वारला. समजताच त्याच्या पायाखालची जमीन सरकली. विश्वासच बसेना. काय करावं सुचेना. कसं रडावं? शब्द फुटेना. हंबरडा आतल्याआत थिजलेला. त्याला शोक व्यक्त करता येईना. हातपाय गाळून बसला. लगेच समाजानं टोचत त्याला कार्यक्रम उद्युक्त केलं. मोबाईलमधून त्यानं नातेवाईकांचे नंबर काढत फटाफट फोन केले. नातेवाईकांसोबत उभं राहून अंत्ययात्रेची तयारी केली. लाकूड, मीठ, घासतेल, तूप, मुरमुरे सर्व विकत घेऊन स्मशानात पोचवायची व्यवस्था केली. कापड आणलं. कुवारा मुलगा वारला म्हणून रुईशी लग्न लावायला ब्राह्मण आणला. पीएम करुन आणताच मुलाची अंघोळ घालून- लग्न लावून अंत्ययात्रा काढली. गल्लीनं मिरवत अमरधामात अग्नी द्यायचा कार्यक्रम साजरा झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी राख सावडण्याचा कार्यक्रम. दारावर येणाऱ्या लोकांसमक्ष रडून शोक प्रदर्शनाचा कार्यक्रम. दहाव्याला डोक्याचे केस काढण्याचा कार्यक्रम. गंधमुक्तचा कार्यक्रम. नातेवाईकांना पंगत देण्याचा कार्यक्रम. अकराव्या दिवशी अकरा सवाष्णी जेऊ घालण्याचा कार्यक्रम. बाराव्याला दिवस म्हणतात. दिवसाला पुन्हा नातेवाईक- मित्रांना जेऊ घालण्याचा कार्यक्रम.

महिण्याचा पित्तर म्हणजे जेवणच. बारा महिने होईपर्यंत दर महिन्याला पित्तरांचं जेवण. शेवटी मुलाचा वर्षाचा पित्तर. वर्षश्राध्द. म्हणजेच पुन्हा जेवणाचा कार्यक्रम करुन बाप विसावणार. बाप रे! दम लागून आला. मुलाच्या मृत्यूनंतरचे पारंपरिक कार्यक्रम करत बाप पार थकून गेला. कार्यक्रमांच्या व्यस्ततेमुळं- ताणामुळं- कार्यक्रमांसाठी पैशांच्या कडकीमुळं- लोकसहभागामुळं- जेवणावळींच्या पक्तींमुळं मेलेल्या मुलाचा बाप, मुलगा वियोगाचं दु:ख सहज विसरुन जाईल, असं समाजाला प्रामाणिकपणे वाटत राहिलं. *२. कार्यक्रम'हॅलो''हां बोला''माझी आई वारली''अच्छा, कार्यक्रम केव्हा आहे?' *३. मंदिराततो तेरा वर्षाच्या चिमुरडीला म्हणाला,'मंदिरात येतेस का?' छकुली रागाने फुत्कारली, 'काका, काय हो हे! शोबतं का तुम्हाला!' (दिनांक : 13-04-2018, संदर्भ : कथुआ, जम्मू काश्मीर)*४. पायांशिवाय पायांशिवाय पायऱ्या चढायच्या...*५. पाया एका माणसाला गावात घर बांधायचं होतं. आपल्या जागेची (प्लॉटची) त्याने साफसफाई करुन काटेकोर मोजून घेतली. घर मजबूत उभं रहावं म्हणून जमिनीत खोल पाया खोदला. पाया भरुन ओटा (प्लींथ) तयार केला. भिंती बांधायला सुरुवात केली. लेंटल टाकली. वर पुन्हा भिंती बांधल्या. स्लॅप टाकला. वर पॅरॅफिट बांधलं. बाथरुम- टॉयलेट वगैरेही. घराच्या आतून गिलावा (प्लॅस्टर) करून घेतला. फरशी बसवून घेतली. हे सगळं आर्थिक ताण सोसता येईल तसं दीड वर्ष चाललं. फरशी बसवून होण्याच्या दिवशी संध्याकाळी या माणसाचा शहरातला भाऊ गावात आला. घराजवळ येऊन माणसाला म्हणाला, 'इतके दिवस लागतात? उद्यापासून मी बघतो. तू येऊ नको इकडे.' दुसऱ्या दिवशी शहरातल्या भावाने दारे- खिडक्या आयते आणून घराला बसवले. घराला बाहेरुन गिलावा करुन घेतला. घराच्या चौकटीवर देवाची टाईल बसवली. दोन दिवस पाणी मारलं. पेंटर आणून आतून बाहेरुन रंग देऊन घर चकचकीत करुन घेतलं.

आणि गल्लीत उभं राहून तो ज्याला त्याला ओरडून सांगू लागला, 'माझा भाऊ या घराचं काम दीड वर्ष करत बसला. मी पंधरा दिवसात करुन दाखवलं!' तात्पर्य, ज्याच्या त्याच्यावर (म्हणजे कथा वाचकावर) सोपवलेलं बरं...*६. देढगुजरी भाषा दूर देशीच्या दोन गारूडींच्या नादी इथले तीन माठे लागले. गारूडी पुंगी वाजवायचे, डमरू वाजवायचे, टोपली दाखवायचे. आणि ते दोन ह्या तिघांसाठी गळ लावत आपसात म्हणायचे, "ह्या नावांढगा एंडरकोचा यमुरदा फारदा एक्करदा!" ऐकून न समजूनही तिघे आलटून पालटून मेंढूळ सरपटून संमोहित व्हायचे. आणि शेपटीकडून पळावं की तोंडाकडून, ते न कळून बऱ्याचदा जागच्याजागी वळवळत तात्काळ उत्तरायचे, "एस सर, जी जी!" गारूडी ह्या माठ्यांची पाठ थोपटायचे. सगळंच काम सांगता सोपवता 'सू करानी छे' हे पण सांगायचे. हाताच्या ओंजळी पुढं करत हे तिघे तात्काळ उत्तरायचे, "एस सर, जी जी!" गारूड्यांच्या शाबासकीसाठी हे माठे रोज उतावळे व्हायचे. भरलेल्या टोपल्यांसह पाठ थोपटून घेण्यासाठी पुढं तिघांचे तीनशे झाले. दोन तीन वर्षांतच टोपल्या जाऊन टपल्या खात तिघांसहीत तीनशे तण्याठालटमें भरती करावे लागले! त्यांची देढगुजरी भाषा आता कोणालाच कळत नाही!*७. अस्मिता ती घरातून बाहेर पडताना नवऱ्याला म्हणाली, 'मत मालूला देऊ ना?' तो म्हणाला, 'साधूला दे.' ती म्हणाली, 'साधू, ना ओळखीचा ना पाळखीचा ना सामाजिक कामाचा. गुन्हेगारही आहे तो. मालूला देते.' तो म्हणाला, 'मालू, जातीची ना पातीची ना धर्माची. साधूलाच दे.'ती घुटमळत मनधरणी करत म्हणाली, 'पण माझी मैत्रीण आहे. लोकांवर जीव ओवाळून कामं करणारी आहे. शिकली सवरलेली ज्ञानी आहे. मग कोणाला देऊ नक्की?' तो ठामपणे म्हणाला, 'साधूलाच दे. कामं करणार नसला तरी जाती- धर्माचा माणूस पाहिजे! ती शिकलेली बाई काय कामाची? माणसानं कसं अस्मितेनं जगलं पाहिजे!' * ८. मुलगा आणि मुलगी खूप फरक पडतो

नाशिक पासून सव्वाशे किलोमीटरवर एक खेडं. त्या खेड्यातल्या मुलीला बारावी सायन्सची सीईटी द्यायची होती. मुलीला भाऊ नाही. बाप अंध. आईला शहरातलं काहीच कळत नाही अशी अडाणी. सीईटी परीक्षेसाठी नियोजन असं होतं : नुकताच लग्न झालेला एक तरूण नातेवाईक नाशकात राहतो. त्याच्याकडे आई आणि मुलगी आदल्या दिवशी मुक्कामाला जाणार होती परीक्षेसाठी. त्याच दिवशी गेली असती तर परीक्षा सापडणार नव्हती. पण सीईटीच्या दोन दिवस आधी त्या तरूण नातेवाईकाची बायको अचानक माहेरी गेली. आता मुलीच्या आईला आणि मुलीला पेच पडला, त्या तरूणाच्या घरी आपण मुक्कामाला जायचं कसं? तो एकटा. त्याच्या बायकोला काय वाटेल? तरूणाच्या आईबापांना समजेलच, त्यांना काय वाटेल? बाप म्हणाला, 'मी येतो सोबत, आपण हॉटेलवर राहू.' मुलगी नाही म्हणाली. 'मी परीक्षा देऊ का तुमची काळजी करत राहू. बाहेर कसं थांबाल?' आई आणि मुलीला पाठवून हॉटेलला रहायला सांगणंही त्याला जोखीम वाटली. तरूणाच्या मनात पाप नाही. आपल्या मनात काही नाही. पण हा मनाचा खेळ चालला लोकलाजेस्तव. नातेवाईक काय म्हणतील? कोण कोण काय काय म्हणेल? अमूक काय म्हणेल? बाप मनात म्हणाला, मुलगी ऐवजी मुलगा असता तर आदल्या दिवशी एकटा जाऊन राहिला असता त्याच्या रूमवर. कोणी काहीही बोललं नसतं. कोणी शंका घेतली नसती! आजपर्यंत आपण मुलगा आणि मुलगी भेद मानला नाही. पण प्रत्यक्षात किती मोठा फरक पडतो, हे आज कळलं! ('हंस' दिवाळी अंक, २०२५ मध्ये प्रकाशित ८ अलक. इतरत्र प्रकाशित करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)

**डॉ. सुधीर राजाराम देवरेब्लॉगचा पत्ता : http://sudhirdeore29.blogspot.com/**

## निळा आसमंत सारा

फेसाळला किनारा,
लाटांचा बसतो मारा.
फेसाळलेल्या लाटा,
देत नाही कुणा थारा. १

सागरात छान दिसतो,
निळा आसमंत सारा.
लाटासवे खुणावतो,
उष्णतेचा पहा वारा. २

आनंद खूप देतात,
फेसाळलेल्या लाटा.
उठता तरंग लाखो,
दिसतात हजार वाटा. ३

निळाईने शोभिवंत,
फेसाळलेला सागर.
पर्यटकांना देतो सदा,
भरून प्रेमाचा घागर. ४

सागर किनारी चाले,
रेतीत मस्त खेळ.
जीवनात आनंदाचे,
बसतोय छान मेळ. ५

दरवर्षी आनंदाने,
सागर किनारी जावे.
आनंदाचे क्षण वेचून,
आनंदीत होऊन यावे. ६



**नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103



Om Shanti Bahuuddeshiya Shikshan Sanstha's

**GURU MISHRI AYURVED COLLEGE & AYURVED HOSPITAL**

Shelgaon, Tq. Badnapur, Dist. Jalna

MUHS Nashik · NCISM · AYUSH

Applications are invited from eligible candidates for the following positions:

| | | |
|---|---|---|
| 1. | Professor/Associate Professor - Swasthavritta & Yoga | - 01 (Open) |
| 2. | Hospital Superintendent (Ayurved Hospital) | - 01 (Open) |

**Eligibility:** As per NCISM, MUHS, AYUSH and Government norms.
**Notes:** Eligible candidates should send their detailed CV along with Two sets of Xerox copies of essential documents.

**INTERVIEW DETAILS:**
Date: 24/06/2026 Time: 11:00 AM
Place: Guru Mishri Ayurved College, Shelgaon, Tq. Badnapur, Dist. Jalna.

Dr. Yogesh Desarda (Secretary) Mob. 9823728282
Dr. Bhushan Dhawale (Principal) Mob. 9881966771

Email: gurumishriamc@gmail.com | Web: gurumishriamc.edu.in

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६


## राज्यभर एस टी चा ७८ वा वर्धापन दीन साजरा पण परभणी जिंतूर परतीला प्रवास्यांचे प्रचंड हाल




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** परभणी जिल्ह्याचे ठिकाण असल्याने नेहमी गर्दी असते असे असतानाही योग्य नियोजन आभावी रात्री ११ पर्यंत प्रवास्यांना हाल सोसावे लागलेत दरम्यान रात्री ९ ते ११एकही बस जिंतूर कडे मार्गस्त झाली नसल्याने प्रवास्यांचे प्रचंड हाल झालेत महाराष्ट्र राज्य परिवाहन महामंडळ चा ७८ वा वर्धापन दीन उत्सहात साजरा झाला खरा पण जिंतूर आगारात सकाळी वर्धापन दीन निमित्त फुल देऊन सन्मानित केल खरं पण त्याच रात्री ९ ते ११पर्यंत प्रवास्यांचे प्रचंड हाल झाले नेहमी प्रमाणे परभणी बस स्थनक वरून रात्री प्रचंड गर्दी राहत असूनही वर्धापन दीन आहे याच कोणतंही भान नं ठेवता रात्री ९ ते ११एकही बस नव्हती महिला वृद्ध प्रवासी आणि लहान मुले अक्षरशः त्रासून गेले त्यात पाऊस वारा लाईट बंद यां स्थितीचा सामना केला अखेर बस क्र ४३९५ मानव विकास बस आली आणि सर्व प्रवास्यांनी निस्केचा स्वास सोडला व १२ वा जिंतूर गाठले ही परिस्थिती काही काल होती असं नाही अनेकदा शेवट ची बस वेळ कधी चं पाळत नाही किती हा दुर्लक्षित पणा जिल्ह्यातील सर्वात मोठा तालुका असलेल्या जिंतूर तालुका येथे दळणवळण साठी फक्त एस टी हाचं पर्याय आहे रेल्वे रूट नसल्याने नेहमी गर्दी असते पालकमंत्री यांच्या लेखी पत्रा कडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष चौकट परभणी च्या पालकमंत्री यांनी दोन महिन्या पूर्वीच जिंतूर परभणी हा गोल्डन रूट आहे त्या कडे योग्य लक्ष द्या आणि प्रवास्यांना सुविधा द्या असे कळउनही कोणताही बदल झाला नाही

## हर्षल पाटील JEE Advance परीक्षेत उत्तीर्ण



**गोषेगाव :** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगांव ता भोकरदन जि.जालना या विद्यालयातील विद्यार्थी हर्षल समाधान पाटील यांनी देशातील प्रतिष्ठित JEE Advanced परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे कुटुंबासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हर्षल यांच्या यशाबद्दल आयोजित सत्कार समारंभात जामनेरचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी विष्णू काळे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी हर्षल यांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनिल वाकेकर संस्थेच्या सचिव जयश्रीताई बनकर मॅडम यांनी उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य नियोजनाच्या बळावर यश मिळवावे, असे मार्गदर्शन केले.हर्षल यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. त्यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षांची प्रेरणा मिळणार असे मत पर्यवेक्षक निलेश कंकाळ यांनी मांडले. यावेळी मान्यवर, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६


## गोडघाशा चिंटू

आमचा चिंटू
अंगात आहे रोड
कारण तो खातो
खूप खूप गोड

सकाळी हवे त्याला
दुधासोबत बिस्किट
नास्त्याला खिर पाहिजे
आई सोबत किटकिट

जेवणात भातासोबत
साखर खाण्याचे खुळ
आईला दरडावून म्हणतो
पोळी सोबत हवा गूळ

रोज रोज खातो
चाॅकलेट अन् कॅडबरी
जमा केलेले पैसे
खर्चून टाकतो सारी

एके दिवशी त्याचे
पोट दुखू लागले
डाॅक्टरांनी तपासून त्याला
कडू औषध दिले

बिचाऱ्या चिंटूची
चांगलीच मोडली खोड
तेव्हापासून बंद केले
रोज रोज खाणे गोड



## डॉ. राजाराम शेंडगे यांची भाजपा वैद्यकीय आघाडीच्या मराठवाडा विभाग सहसंयोजक पदी नियुक्ती



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक (उपाध्यक्ष) पदी उमरगा येथील प्रसिद्ध शल्य शल्य चिकित्सक डॉ. राजाराम शेंडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पक्षाने ही जबाबदारी सोपवली आहे. भाजपा वैद्यकीय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाळासाहेब हरपळे आणि आघाडीचे प्रभारी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी अधिकृत पत्राद्वारे या नियुक्तीची घोषणा नुकतीच केली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली आहे. डॉ. शेंडगे हे गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अविरतपणे कार्यरत आहेत. विशेषत: गोरगरीब रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना आरोग्य सेवा मिळवून देण्यात त्यांचा मोठा पुढाकार असतो. त्यांच्या याच सेवाभावी वृत्तीचा विचार करून, मराठवाडा विभागात भाजपा वैद्यकीय आघाडीचे संघटन अधिक बळकट करण्यासाठी ही निवड करण्यात आली आहे. पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील सामान्य माणसापर्यंत पोहोचवणे आणि आरोग्यविषयक शासकीय योजनांचा लाभ गरजू रुग्णांना मिळवून देणे, हे आपले मुख्य उद्दिष्ट असेल, अशी प्रतिक्रिया डॉ. शेंडगे यांनी या निवडीनंतर व्यक्त केली. या निवडीबद्दल उमरगा परिसरातील वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातून डॉ. राजाराम शेंडगे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रासायनिक खते खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे अवाहन




**कन्नड (अरुण थोरात) :** रासायनिक खतांचा काळा बाजार रोखण्यासाठी कृषी विभागाने एप विकसित केले असून, ऑनलाईन नोंदणी शिवाय रासायनिक खते मिळणार नसल्याने, एप द्वारे नोंदणी करण्याचे अवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. केंद्र सरकारचा खत ऑनलाइन बुकिंगचा पथदर्शी प्रकल्प संभाजीनगर जिल्ह्यात दि. ५ जून २०२ ६ पासून राबविण्यात येणार आहे.महाराष्ट्रात कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्यात केंद्र सरकारचा "National framework for fertilizer sale app" या नावाने शेतकऱ्यांसाठी खत ऑनलाईन बुकिंग हा पथदर्शी प्रकल्प दि. ०५ जून २०२६ पासून राज्यात सुरुवात होत आहे. या संदर्भात कृषी विभागाकडून प्रचार व प्रसिद्धी सुरू आहे. सदर अॅपमध्ये शेतकऱ्यांनी फार्मर आयडी वापरून ऑनलाइन खताची बुकिंग करायची आहे. जमिनीच्या क्षेत्राचा तपशील, पिकांचा तपशील, खतांची निवड, किरकोळ खत विक्रेत्यांची निवड ही माहिती भरल्यानंतर QR Code किंवा टोकन नंबर तयार होईल. सदरचा QR Code हा जनरेट झाल्यापासून ०३ दिवसांपर्यंत वैद्य राहणार आहे.सदरचा QR Code किंवा टोकन नंबर संबंधित कृषी सेवा केंद्रावर दाखवल्यानंतर नोंदणी केलेले खत EPos मशीनद्वारे शेतकऱ्यांना वितरित होणार आहे. सदरचे अॅप हे दि. ५ जून २०२६ पासून सुरु होणार आहे. यापुढे ऑनलाईन खत बुक केल्याशिवाय खत विक्री होणार नाही. यासाठी कृषी विभागामार्फत तालुका कृषी अधिकारी कन्नड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, गुण नियंत्रण निरीक्षक, कृषी मित्र व कृषी सेवा केंद्र मार्फत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना खत अॅप बाबत अवगत करण्याविषयी प्रचार व प्रसिद्धीचे काम करण्यात येत आहे. कन्नड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना सदरचे अॅप डाऊनलोड करून वापर करण्याविषयी कन्नड तालुकाकृषी अधिकारी संदीप शिरसाठ व कृषी अधिकारी तथा गुण नियंत्रण निरीक्षक मनोज सैंदाणे यांनी आवाहन केले आहे.

## अब्दुल सत्तार-अंबादास दानवे आमने सामने; गळाभेटीनंतर विलीनीकरणाच्या चर्चांना नवे बळ



**छत्रपती संभाजीनगर :** शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना सोमवारी आणखी खतपाणी मिळाल्याचे चित्र दिसून आले. ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे आणि शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांची समृद्धी महामार्गावर अचानक भेट झाली. विशेष म्हणजे, अवघ्या एक दिवसापूर्वी दोन्ही नेत्यांनी शिवसेनेचे दोन गट भविष्यात एकत्र यावेत, असे मत व्यक्त केले होते. त्यामुळे त्यांच्या या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले होते. भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी एकमेकांची गळाभेट घेतल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अब्दुल सत्तार मुंबईकडे प्रवास करत होते, तर अंबादास दानवे शिर्डीकडे जात होते. याचवेळी समृद्धी महामार्गावर दोघे समोरासमोर आले. अचानक झालेल्या या भेटीत दोघांमध्ये काही काळ संवादही झाला. काल केलेल्या वक्तव्यांनंतर लगेचच दोन्ही नेत्यांची प्रत्यक्ष भेट झाल्याने शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये काही सकारात्मक हालचाली सुरू आहेत का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

या भेटीला आणखी महत्त्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींना तातडीने मुंबईत बोलावले आहे. या बैठकीसाठीच अब्दुल सत्तार मुंबईकडे रवाना झाले होते. अशा परिस्थितीत मुंबईतील महत्त्वाच्या बैठकीपूर्वी सत्तार आणि दानवे यांची भेट झाल्याने अनेक राजकीय अर्थ काढले जात आहेत. विशेषतः दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर ही भेट अधिकच चर्चेचा विषय ठरली आहे.

दरम्यान, भाजपविरोधातील नाराजी उघडपणे व्यक्त केल्यानंतर अब्दुल सत्तार यांना तातडीने मुंबईत बोलावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सत्तार यांच्यासोबत महत्त्वाची बैठक होणार असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत समीर सत्तार यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुद्द्यावर तसेच सत्तार यांच्या नाराजीवर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या बैठकीकडे महायुतीतील नेत्यांचे लक्ष लागले आहे.

अब्दुल सत्तार यांनी अलीकडेच भाजपवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. शिवसेनेच्या त्यागाची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत त्यांनी मित्रपक्षावर निशाणा साधला होता. भाजपने आधी शिवसेनेचे हातपाय तोडले आणि आता थेट अस्तित्वावरच घाव घातल्याचा आरोपही त्यांनी केला होता. दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवसेनेच्या गोटातही अस्वस्थता वाढल्याचे बोलले जात आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यातील ६ आमदार आणि १ खासदाराला मुंबईत बोलावले असून स्वतंत्र चर्चा करणार आहेत. त्यामुळे दानवे-सत्तार भेट, सत्तारांची नाराजी आणि मुंबईतील बैठका यामुळे राजकारणात नव्या चर्चांना वेग आला आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६


# कडक उन्हाळयामध्ये ७५ वर्षीय शेतकऱ्यांचे उपोषण सुरु



**अकोला :** सविस्तर माहिती असे की अकोला जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी श्री शरद जावळे व तलाठी श्री देशमुख यांनी बौद्ध समाजाची व्यक्ती देवमन पुंडलिक ढवळे यांची जमीन रत्नाबाई गावंडे यांच्या नावावर गैर कायदेशीरपणे नोंदवली आहे.मौजे जलालाबाद ता.जी अकोला येथील गट क्रमांक ५३ क्षेत्र एक हेक्टर ३२ आर. ही देवमन पुंडलिक ढवळे यांच्या मालकीची असून सदर जमीन वर्ग दोन मधील आहे. देवमन पुंडलिक ढवळे यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी देविदास गावंडे यांच्याकडून सन १९९६ मध्ये रक्कम १५०००/ व्याजाने घेतले होते. त्याकरिता नाममात्र खरेदी म्हणून मौजे जलालाबाद येथील गट क्रमांक ५३ मधील ०.हे ५१आर या क्षेत्राचे खरेदीखत रत्नाबाई देविदास गावंडे यांच्या नावे दिनांक २९.२. १९९६ रोजी नोंदवून दिले होते. सदर खरेदीखत हे वर्ग २ चे व तुकडे बंदी कायद्यांतर्गत येत असल्यामुळे त्याची नोंदणी न करण्याचे ठरले होते तसेच ताबा देवमन पुंडलिक ढवळे यांचाच राहील असे ठरले होते. रक्कम परत केल्यानंतर खरेदी खाते सुरतीपासून गैर कायदेशीर असल्यामुळे तुकडे बंदी कायद्यात असल्यामुळे रद्द करण्याची आवश्यकता नव्हती.सण २०१३ मध्ये रत्नाबाई व त्यांचे पती देविदास गावंडे यांनी खरेदी खताचा दुरुपयोग करण्याची धमकी पुंडलिक ढवळे यांना दिली. म्हणून त्यांनी न्यायालयात दावा दाखल केला असता न्यायालयाने देवमन पुढील ढवळे यांच्या बाजूनेच न्यायालयीन निकाल दिला आणि रत्नाबाई देविदास गावंडे, आणि देविदास गावंडे यांनी अडथळा करू नये असा कायमचा हुकूम अकोला येथील दिवाणी न्यायालयाने दिला आहे. याबाबत रत्नाबाई गावंडे तसेच तलाठी देशमुख मौजे जलालाबाद व उपविभागीय अधिकारी यांना माहिती आहे. असे असताना सुद्धा देवमन पुंडलिक ढवळे हे अनुसूचित जातीचे असल्यामुळे तलाठी श्री देशमुख आणि उपविभागीय अधिकारी श्री शरद जावळे तसेच रत्नाबाई गावंडे यांनी संगणमत करून देवमन पुंडलिक ढवळे यांना नुकसान पोहोचावे याकरिता गैर कायदेशीररित्या कायद्यात कोणतीही तरतूद नसताना तुकडेबंदीचा भंग करणारे खरेदीखत आणि न्यायालयीन आदेश असताना सुद्धा व देवमन पुंडलिक ढवळे यांना नोटीस दिल्यास ते न्यायालयाचा आदेश व ताब्याबाबत आक्षेप दाखल करतील व त्यांना संधी मिळू नये याकरिता वरिष्ठ जातीचे उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही नोटीस देवमन ढवळे यांना दिली नाही. कोणताही न्याय निवाडा करत असताना विरुद्ध पार्टीला नोटीस देणे हे नैसर्गिक न्यायाचे तत्व आहे आणि ते कायदेशीर आहे विरुद्ध पार्टीला ऐकल्याशिवाय तुम्ही कोणताही न्याय देऊ शकत नाही. असे काय घडले की उपविभागीय अधिकारी यांना देवमन ढवडे यांना नोटीस काढावेसे वाटले नाही. जर दिवाणी न्यायालयाने देवमन ढवळे हेच मालक असल्याचा न्याय निवाडा दिला असेल तर न्यायालयापेक्षा उपविभागीय अधिकारी मोठे होऊ शकतात का.? अशा कोणत्या कायद्याचा वापर करू न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून उपविभागीय अधिकारी यांनी हा फेरफार केला अशाप्रकारे अनेक शंका येथे उपस्थित होतात. तसेच तलाठी देशमुख यांच्याकडे कोणतेही रत्नाबाई यांच्या ताब्याबाबतचे दस्त नसताना सुद्धा त्यांनी ताब्याचा दस्त खोटा तयार केला. त्यामुळे उपविभाग अधिकारी व तलाठी आणि रत्नप्रभात गावंडे यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा केलेला आहे. खोटे दस्त बनविणे तसेच त्याला नुकसान पोहोचवणे त्यांना नोटीस न देणे त्यांचे म्हणणे न ऐकणे कोणताही ताबा बाबत दस्त नसताना सुद्धा उपविभागीय अधिकारी श्री जावळे साहेब यांनी पदाचा दुरुपयोग करून गैर कायदेशीर रित्या देवमन पुंडलिक ढवळे यांच्या मालकीची जमीन रत्नाबाई गावंडे यांच्या नावावर केलेली आहे. उपविभागीय अधिकारी तसेच तलाठी आणि रत्नाबाई गावंडे यांची तक्रार देवमान ढवळे यांनी २/९/२०२५ रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाणे अकोला येथे केली असता सुद्धा पोलीस अधिकारी श्री बाळू पवार यांनी कोणत्याही प्रकारे दखल न घेतली नाही. हीच तक्रार अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक साहेब यांना सुद्धा पाठवले आहे. तरीसुद्धा संबंधित व्यक्तीवर गुन्हे दाखल झाले नाहीत करिता बौद्ध समाजाचे वयोवृद्ध शेतकरी देवमन पुंडलिक ढवळे हे दिनांक १ जून २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय अकोला समोर न्याय मागण्या करता उपोषणाला बसले आहेत. संबंधित खोटे दस्तऐवज बनवणाऱ्या अधिकाऱ्यावर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल व्हावे यासाठी त्यांनी उपोषण चालू केले. संबंधित उपोषणाची अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक साहेब आणि महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री साहेब यांनी दाखल घेऊन. संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावे तसेच गैर कायदेशीर दृष्ट्या केलेला फेरफार रद्द करावा करावा. आणि बौद्ध कुटुंबातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा. हीच अपेक्षा.

## ठाकर समाजाच्या जात वैधतेचा प्रश्न मार्गी लावा आक्रमक आणि लक्षवेधी



**खुलताबाद(सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्ह्यातील आदिवासी ठाकर समाज प्रामुख्याने कन्नड, सोयगाव, सिल्लोड आणि खुलताबाद तालुक्यातील गौताळा परिसरातील डोंगररांगांमध्ये वास्तव्य करतो. ठाकर बांधव अतिशय दुर्गम भागात पिढ्यानपिढ्या राहत असून या व्यतिरिक्त कोणत्याही तालुक्यात राहत नाही.अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात सह आयुक्त तथा उपाध्यक्ष यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ठाकर समाजामध्ये घुसखोरी चे प्रमाण वाढत आहे ती घुसखोरी थांबावी व कोणत्याही प्रकारची ठाकर समाजामध्ये घुसखोरी होऊ नये आणि आदिवासी ठाकर समाजाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे दाखल आहेत ते तात्काळ निकाली काढण्यात यावेत याकरिता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे सह आयुक्त श्रीमती बोंद्रे मॅडम यांना गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवा भावी संस्था या संघटनेचे अध्यक्ष पांडू कडाळे आणि गंगाराम मेंगाळ, नामदेव मेंगाळ,काळु पथवे,बाळु सावंत,सनिराम गावंडे, पंकज सावंत, सुरज मेंगाळ, भागिनाथ सावंत सीताबाई मेंगाळ, शोभाबाई अघान, पमाबाई वाजे, सरुबाई कडाळे, आशाबाई कडाळे, इत्यादी विद्यार्थी व महिला पुरुष कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

## सत्यशोधक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इंडियन आर्मीमध्ये निवड



**कायगाव :** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी अजय सोनाजी खरात (कायगाव) व मंगेश रामकिसन वाकेकर (गोषेगाव) या अत्यंत मेहनत आणि कठीण परिश्रम घेऊन या विद्यार्थ्यांचे इंडियन आर्मी मध्ये निवड झाली. या दोघांचे पूर्ण शिक्षण सत्यशोधक विद्यालय गोषेगाव येथे झाले आहे त्या दोन विद्यार्थ्यांनी निवड झाल्याबद्दल प्राचार्य श्री. सुनीलजी वाकेकर सर व सर्व शिक्षक वृंद यांचे आभार मानले, त्यांनी सांगितले की हे यश आम्हाला विद्यालयातील शिक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार मिळाले याचा आम्हाला आनंद आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर सर व संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस


डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६

# सायकल : शाश्वत भविष्याचा जीवनमार्ग- डॉ. राजेंद्र बगाटे



दरवर्षी ३ जून हा दिवस जगभरात 'जागतिक सायकल दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने २०१८ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देऊन सायकलच्या सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक महत्त्वाला जागतिक स्तरावर अधोरेखित केले. मानवाच्या इतिहासातील सर्वात साध्या, स्वस्त, विश्वासार्ह आणि उपयुक्त शोधांपैकी एक म्हणून सायकलकडे पाहिले जाते. दोन चाकांवर चालणारे हे साधे वाहन केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि शाश्वत विकास यांचे प्रतीक बनले आहे. आजच्या आधुनिक युगात मोटारगाड्या, दुचाकी, रेल्वे, विमान यांसारख्या जलद वाहतूक साधनांची उपलब्धता वाढली असली तरी सायकलचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट वाढते प्रदूषण, वाहतुकीची समस्या, इंधन संकट, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यामुळे सायकलचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. त्यामुळे जागतिक सायकल दिन हा केवळ एका वाहनाचा गौरव करणारा दिवस नसून मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलित नात्याची जाणीव करून देणारा दिवस आहे.सायकलचा इतिहास पाहिला तर तो अत्यंत रंजक आणि प्रेरणादायी आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला सायकलच्या विविध स्वरूपांचा विकास सुरू झाला. १८१७ मध्ये जर्मनीतील संशोधक कार्ल व्हॉन ड्राइस यांनी 'ड्रेझीन' नावाचे दोन चाकांचे वाहन विकसित केले. त्यानंतर अनेक संशोधकांनी त्यात सुधारणा केल्या आणि आधुनिक सायकलचा जन्म झाला. पेडल, चेन, ब्रेक आणि रबरी टायर यांचा समावेश झाल्यानंतर सायकल अधिक सुरक्षित आणि उपयुक्त बनली. औद्योगिक क्रांतीनंतर सायकलचा प्रसार झपाट्याने वाढला. ती सामान्य माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. विशेषतः कामगार, विद्यार्थी, शेतकरी आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी सायकल हे स्वस्त आणि विश्वासार्ह वाहतूक साधन ठरले. भारतातही ब्रिटिश काळात सायकलचा प्रसार झाला आणि हळूहळू ती ग्रामीण व शहरी जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली.सायकलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची साधी रचना आणि सहज उपलब्धता. पेट्रोल, डिझेल, वीज किंवा इतर कोणत्याही इंधनाची गरज नसलेले हे वाहन मानवी शक्तीवर चालते. त्यामुळे ती आर्थिकदृष्ट्या अत्यंत किफायतशीर आहे. वाढत्या महागाईच्या काळात वाहतुकीसाठी होणारा खर्च कमी करण्यासाठी सायकल हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सायकल आजही उपयुक्त वाहतूक साधन आहे. विशेषतः ग्रामीण भागात शाळा, बाजारपेठ, शेत आणि विविध कामांसाठी जाण्यासाठी लाखो लोक सायकलचा वापर करतात. अनेक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या प्रवासात सायकल ही महत्त्वाची साथीदार ठरते. त्यामुळे सायकल ही सामाजिक आणि आर्थिक समतेचे प्रतीक मानली जाते.आरोग्याच्या दृष्टीने सायकलचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. कार्यालयीन कामे, संगणकाचा वाढता वापर, मोबाईल आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे लोक अधिक वेळ बसून राहू लागले आहेत. परिणामी लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत सायकल चालविणे हा अत्यंत प्रभावी आणि सोपा व्यायाम आहे. सायकल चालविताना शरीरातील जवळपास सर्व स्नायू सक्रिय होतात. हृदयाची कार्यक्षमता वाढते, रक्ताभिसरण सुधारते, फुफ्फुसांची क्षमता वाढते आणि शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. नियमित सायकलिंगमुळे शरीर तंदुरुस्त राहते तसेच अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होतो.मानसिक आरोग्य सुधारण्यातही सायकल महत्त्वाची भूमिका बजावते. वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मानसिक ताणतणाव, चिंता आणि नैराश्य यांचे प्रमाण वाढत आहे. सायकल चालविताना व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात येते, मोकळ्या हवेत वेळ घालवते आणि मनाला आनंद देणारा अनुभव मिळवते. यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. अनेक संशोधनांमध्ये नियमित सायकलिंगमुळे आत्मविश्वास वाढतो, मन प्रसन्न राहते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते असे दिसून आले आहे. त्यामुळे सायकल ही केवळ शारीरिक आरोग्याची नव्हे तर मानसिक आरोग्याचीही प्रभावी गुरुकिल्ली आहे.पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सायकलचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आज जगासमोर उभे असलेले सर्वात मोठे संकट म्हणजे हवामान बदल. औद्योगिकीकरण, वाढती वाहनसंख्या आणि जीवाश्म इंधनांचा प्रचंड वापर यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. परिणामी जागतिक तापमानवाढ, अनियमित पाऊस, पूर, दुष्काळ आणि विविध नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. मोटार वाहनांमधून होणारे वायुप्रदूषण हे या समस्येचे एक प्रमुख कारण आहे. सायकल मात्र कोणतेही प्रदूषण निर्माण करत नाही. ती कार्बनमुक्त वाहतुकीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अधिकाधिक लोकांनी सायकलचा वापर केल्यास इंधनाची बचत होईल, प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.शहरी भागांमध्ये वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. मोठ्या शहरांमध्ये वाहनांची संख्या प्रचंड वाढल्यामुळे रस्त्यांवर सतत गर्दी असते. यामुळे वेळेचा अपव्यय, इंधनाचा जास्त वापर आणि प्रदूषण वाढते. अशा परिस्थितीत सायकल हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. सायकलला कमी जागा लागते, ती सहजपणे चालवता येते आणि वाहतुकीवरील ताण कमी करते. जगातील अनेक विकसित देशांनी सायकलस्नेही शहरे उभारण्यावर भर दिला आहे. स्वतंत्र सायकल मार्ग, सुरक्षित पार्किंग आणि सार्वजनिक सायकल शेअरिंग यंत्रणा यांमुळे सायकलचा वापर वाढला आहे. भारतातील काही शहरांनीही या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.सायकल आणि शाश्वत विकास यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये आरोग्य, पर्यावरण संरक्षण, गरिबी निर्मूलन, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत शहरे यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. सायकल या सर्व उद्दिष्टांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हातभार लावते. ती स्वस्त वाहतूक उपलब्ध करून देते, आरोग्य सुधारते, प्रदूषण कमी करते आणि ऊर्जा बचतीला प्रोत्साहन देते. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने सायकल हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो.भारतातील ग्रामीण भागात सायकलचे महत्त्व विशेष अधोरेखित करावे लागेल. ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा मर्यादित असते. अशा ठिकाणी सायकल हे लोकांचे दैनंदिन जीवन सुलभ करणारे साधन आहे. शेतकरी शेतात जाण्यासाठी, विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी, कामगार कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी आणि महिला विविध घरगुती कामांसाठी सायकलचा वापर करतात. अनेक सामाजिक योजनांमधून विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणात सकारात्मक बदल झाला आहे. शाळेपर्यंतचे अंतर कमी झाल्यामुळे त्यांचे शिक्षण सुरू ठेवणे सोपे झाले आहे. त्यामुळे सायकल ही ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरली आहे.महिलांच्या सक्षमीकरणात सायकलची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. एकेकाळी महिलांना सायकल चालविणे हे समाजात सहज स्वीकारले जात नव्हते. परंतु कालांतराने परिस्थिती बदलली. सायकलने महिलांना स्वतंत्रपणे प्रवास करण्याची संधी दिली. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागासाठी त्यांना गतिशीलता प्राप्त झाली. ग्रामीण भागातील अनेक मुलींसाठी सायकल ही शिक्षणाकडे जाणारी वाट ठरली आहे. आज अनेक महिला सायकलिंग स्पर्धांमध्ये सहभागी होत आहेत, साहसी सायकल मोहिमा राबवत आहेत आणि समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यामुळे सायकल ही महिला स्वातंत्र्य आणि समानतेचेही प्रतीक बनली आहे.क्रीडा क्षेत्रात सायकलिंगला विशेष स्थान आहे. सायकलिंग हा जगातील लोकप्रिय क्रीडाप्रकारांपैकी एक आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू सहभागी होतात. सायकलिंगमुळे शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक दृढता वाढते. अनेक देशांमध्ये सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते. भारतातही सायकलिंगविषयी जागरूकता वाढत असून अनेक तरुण या क्रीडाप्रकाराकडे आकर्षित होत आहेत.कोविड-१९ महामारीच्या काळात सायकलचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. लॉकडाऊननंतर अनेक लोकांनी सार्वजनिक वाहतुकीऐवजी सायकलचा वापर सुरू केला. आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी सायकल हा उत्तम पर्याय असल्याचे लोकांच्या लक्षात आले. अनेक शहरांमध्ये सायकल विक्रीत मोठी वाढ झाली. महामारीनंतरही अनेकांनी सायकलिंगची सवय कायम ठेवली. यामुळे आरोग्य आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले.तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सायकलच्या क्षेत्रातही अनेक नवकल्पना झाल्या आहेत. आधुनिक सायकली अधिक हलक्या, सुरक्षित आणि कार्यक्षम बनल्या आहेत. इलेक्ट्रिक सायकल किंवा ई-बाईक ही संकल्पना वेगाने लोकप्रिय होत आहे. अशा सायकलींमध्ये बॅटरीच्या सहाय्याने अतिरिक्त ऊर्जा मिळते. त्यामुळे लांब अंतराचा प्रवास अधिक सोपा होतो. तरीही पारंपरिक सायकलचे महत्त्व कमी झालेले नाही. कारण ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी आहे.आजच्या तरुण पिढीसमोर सायकलचा वापर वाढविण्याचे मोठे आव्हान आहे. मोबाईल, इंटरनेट आणि आधुनिक वाहतुकीच्या साधनांमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे तरुणांनी नियमित सायकलिंगचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्था यांनी सायकलिंगविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. सायकल रॅली, जनजागृती मोहीम आणि आरोग्यविषयक कार्यक्रमांद्वारे सायकलचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवता येईल.सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही या संदर्भात महत्त्वाची आहे. सुरक्षित सायकल मार्ग, सायकल पार्किंग सुविधा, सार्वजनिक सायकल भाडे योजना आणि सायकलस्नेही धोरणे यांची अंमलबजावणी केल्यास सायकलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. अनेक विकसित देशांनी अशा उपाययोजनांद्वारे वाहतूक आणि प्रदूषणाच्या समस्या कमी केल्या आहेत. भारतातही अशा उपक्रमांना गती देण्याची आवश्यकता आहे.जागतिक सायकल दिन साजरा करण्यामागील उद्देश केवळ सायकलचा प्रचार करणे नाही, तर समाजाला शाश्वत आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणे हा आहे. या दिवशी विविध देशांमध्ये सायकल रॅली, आरोग्य जनजागृती कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन मोहिमा आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. लोकांना सायकलचा अधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. विशेषतः तरुण पिढीला सायकलचे महत्त्व पटवून देण्यावर भर दिला जातो.सायकल हा केवळ भूतकाळातील वाहतुकीचा वारसा नाही, तर भविष्यातील शाश्वत विकासाचा मार्ग आहे. वाढती लोकसंख्या, मर्यादित संसाधने, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यांचा विचार करता सायकलचे महत्त्व आणखी वाढणार आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात शक्य तितक्या प्रमाणात सायकलचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अगदी अल्प अंतरासाठीही मोटार वाहनाऐवजी सायकलचा वापर केल्यास वैयक्तिक आरोग्य सुधारेल, आर्थिक बचत होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.अखेर, जागतिक सायकल दिन आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की, प्रगती म्हणजे केवळ वेगवान आणि महागडी साधने नव्हेत, तर मानव आणि निसर्ग यांच्यातील समतोल जपणारी जीवनशैलीही आहे. सायकल हा त्या समतोलाचा सर्वात सुंदर आणि प्रभावी नमुना आहे. आरोग्यदायी शरीर, स्वच्छ पर्यावरण, आर्थिक बचत, सामाजिक समता आणि शाश्वत विकास या सर्व मूल्यांना एकत्र जोडणारे साधन म्हणून सायकलकडे पाहणे आवश्यक आहे. दोन चाकांवर चालणारी ही साधी रचना मानवजातीला अधिक निरोगी, अधिक समृद्ध आणि अधिक शाश्वत भविष्याकडे घेऊन जाण्याची क्षमता बाळगते. त्यामुळे जागतिक सायकल दिनानिमित्त आपण सर्वांनी सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचा संकल्प करावा आणि आरोग्य, पर्यावरण तसेच समाजहितासाठी या साध्या पण महान साधनाचा स्वीकार करावा. सायकल ही केवळ प्रवासाची सोय नसून निरोगी जीवन, हरित पृथ्वी आणि उज्ज्वल भविष्याकडे नेणारा विश्वासार्ह जीवनमार्ग आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ जून २०२६


# घुसमटणी - सम्यक विचारधारेची सशक्त कथा डॉ. प्रभाकर शेळके




आंबेडकरी कवी, कथाकार,नाट्यलेखक ,कालकथीत किशोर घोरपडे साहेबांचा 'घुसमटणी' या कथासंग्रहाची नोंद घेणे माझ्यासाठी एक श्रध्देय भावनेचा अनुबंध आहे.घुसमटणी होत राहिली आयुष्याची लेखक लिहित राहिले.काळाने घाव घातला कोरोनाचा त्यातच एक दिवस किशोर घोरपडे या आंबेडकरी साहित्यिकांचा देहांत झाला.पण साहित्यकृती आमच्या वाचकांची हाती चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक कवितेचा मर्मग्राही अनुबंध ठेवून ते गेले.प्रस्तूत कथासंग्रह हा तत्कालीन सामाजिक राजकीय व सांस्कृतिक परिवर्तनाच्या चळवळीच्या परिप्रेक्षाचा एक साक्षेपी धोंडोळा या कथासंग्रहात अतिशय रुपक अनुबंधातून आशय संपन्न सृजन समर्पक आंबेडकरी विचार धारेच्या निर्धार व्यक्त करणाऱ्या लक्षावेधी कथा आहेत.जशी त्याची अतिशय मर्मभेदी कथा म्हणजे 'निळीवर सांडला गुलाल' अर्थात समकालीन वास्तवाच्या राजकारणाचा झाला गुलाम'ही सामाजिक राजकीय वास्तवाची निर्भिड कथा आहे.'धग'या कथेची कुसुमाग्रज यांनी त्या काळात दखल घेतली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची चिंतन आशय संपन्न प्रस्तावना होती.या कथासंग्रहाच्या मनोगतात ते लिहितात "प्रस्थापिताकडून विस्थापितांवर होणारे अन्याय, अत्याचार, शोषण याचे स्वरूप बदलले असले तरी ते थांबले नाहीत.म.ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार-स्वीकारातून ग्रामीण -दलित समाज जागा झाला.तो प्रगतीच्या दिशेने धडपडू लागला.परंतू कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या म्हणीप्रमाणे आज दलित,शोषित, कष्टकरी गरीब माणसाच्या दु:खभोगाला आणि शोषणाला आपलीच माणसं कारणीभूत असल्याचे जाणवते; तेव्हा मी आतल्या आत फाटू जातो.माझी मानसिक घुसमट होऊ लागते.ही घुसमट जशी माझी असते तशीच ती माझ्या पिडीत समाजाची असते.यातूनच 'घुसमटणी' मधील आत्मटिकात्मक कथांचा जन्म झाला"(1मनोगत)'बहुरुपी'या कथेतील आंबेडकरी कार्यकर्ता कसा आहे त्यातील कथानक म्हणतो"साल्ले जो तो आपल्याच ढुंगणावर काड्या ओवाळून घेतो.सगळे एकाच माळेचे मणी.बाबासाहेब म्हणले की,'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा, अन् हे जो तो आपला तंबू उभारतोय.दलित समाजाचे किती प्रश्न आहेत?"(पृ.13)अशी प्रखर वास्तववादी भूमिकेतून हे कथानक आहे.'गलका'या कथेत तत्कालीन ते समकालीन वास्तवाचे चित्रण आहे.म्हणजे वंचित बहुजन गावं खेड्यात खंड्या रौंदळे मांग अन् त्याची बायको धुरपती हिने बकऱ्या कापसात घालून कापूस ही चोरला.पण खरतर कारण विनयभंग आणि बलात्कार असंआहे.दाम्या मांग गावाच्या विरुद्धात गेला म्हणून मारुतीचं मंदिराचं बाटविलं अन् देव फेकून दिले.अशी पोलिसात तक्रार दाखल होते.हा गलका लेखक अतिशय त्रयस्थपणे टिपतात लोक आजकाल कोणत्याही थराला जात आहे.याचे विदारक चित्रण गलका या कथेत येते जसे"देवाच्या मुर्तीची दाम्या मांगानं विटंबना केली!"(पृ 29)'घुसमटणी'ही अतिशय प्रखर वास्तववादी कथा.ज्या संघर्षातून मुलांचे शिक्षण केले.तोच मुलगा पुढे अधिकारी झाला.हाच मुलगा सक्या बापाला म्हणाला हा म्हातारा माझ्या बापाचा सालगडी आहे.ही सखेद वास्तवाची वेदना या कथेतून येते त्यावेळी बापाच्या मनात बाबासाहेबांचे विचार येतात "जन्मदात्या बापाला ईच्यारीत नायीत ते समाजाला काय ईच्यारणार?"बाबासाहेबांच्या सपनाला किड लागू देऊ नगा.एखादं निघतं सोम्यासारखं आतराब.तिकडं ध्यान देऊ नका.अरं बाबांनो -झाडाचं एखादं फळ किडकं निघालं तर झाडं तोडून टाकीत नस्तेत.किडकं फळ तोडून द्यावं लागतं.हे ध्यानात ठुवा.शिका मोठं व्हा.मायबापअन् समाजाला इसरू नका"(पृ.39)या कथेतील आजही वास्तव तितकेच सत्य आहे.'पोलन'ही ग्रामीण वास्तवाचे भान देणारी कथा.साठसत्तराच्या दशकात आधुनिक सरकीचे बियाणे आले.नर मादीचे संक्रमण करून पळ्हाटी काढल्या जात होती.मग या पळ्हाटीचं'पोलन' सीड करण्यासाठी रोजंदारीनं बया लागतं.यात एका नयतरणी गिरजावर इथल्या वासनांध नराधमांने तिच्यावर दोघांनी अत्याचार केला.हे नवऱ्याला माहित.झालं माथेफिरू नवऱ्यानं ही तिला लाथा बुक्यानं अन् ढोरखुब्यांनं तिला मारलं.ती रात्रभर कन्हत राहिली.तिच्या नवऱ्यानं तिला जवळ घेतलं.ती विसरली.चला हे 'पोलन'काम नको.दुसरीकडं कुठबी मिळेल ते काम करू.ही त्याकाळाची कथा आजचे संदर्भही तेच आहेत.आज अंगराची बाग,काद्यांचा मळा,उसथळ, मोलमजुरी करणाऱ्या लक्षावेधी माय माऊल्या हे सहन करता आहेत.'भुरळ' ही जणू एक किरळच आहे, चकवा लागावा.भूरळ पडावी अन् मग जन्माचे हालबेहाल सोसत रहावं.कारण माणसाच्या आतला सैतान हा प्रचंड क्रुरकर्मा आहे.खुंगखार आहे.'संवदा यांनी शेटला बैल जोडी नांगरट करता दिली.पण ह्या शेटच्या पोटात बेइमानी आली.तिथं शेट त्याला धेडपाटा म्हणून उल्लेख करतो.नाही देतं तुह्या बापाला उसणे पैसे देईल हाये.तेंव्हा भांडणं विकोपाला जाते.पोलिस ठेसन.शेवट बाप माफी मागतो.शेट माफ करा पोराची चूक झाली.ही भूरळ पैशाची आहे.इथं पिढीजात गरीबावर अन्याय चालूच आहे.'फास'याकथेतशहरातील एक नोकर अतिशय प्रामाणिकपणे काम करतो आहे.पण रोजचे जगण्याचे व्यवहारीक प्रश्न मनात फास लावता आहेत.इथे सर्वहारा वंचित घटाकातील लोकांचे जगणे अनेक फासा नी आवळले आहेत.पण एका सृजनशील स्नेहाळू लेखकाला आपली मुलं म्हणतात "दादा!खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही गीत लिहून द्या "आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान, शेतकऱ्यांचा राज्यासाठी,लावू पणाला प्राणss"(पृ.81)'किड' इथं माणसंच किडीली झाली.वृत्तीप्रवृती ह्या म्हाळ्याच्या दात इचकून दाखविण्या सारखी आहे.कसे तरतत्कालीन ते समकालीन वास्तवाचे सम्यक भान ही कथा देते.मुख्याध्यापकानेच मुलीवर बलात्कार, म्हाताऱ्याने नातीवर अन्याय,सुनावर अन्याय,साधूनं केला विनयभंग,अशी असंख्य प्रश्नांची किड खत्म होत नाहीत तोपर्यंत ही संविधानिक प्रजासत्ताक्तेची लोकशाही समतेचा संदेश देत नाही असा किड या कथेचा अनुबंध आहे.'गहाण'या लोकशाही स्वातंत्र्याच्या वल्गना फोल ठरता आहेत.कारणइथे राजकीय व्यवस्थेच्या दावणीला माणसाची मन गहाण आहेत.त्याच्या मनाची गळचेपी केली की तो आवाज करीत नाही.किंवा त्याच्या तोंडाता हाडूक देऊन त्याला म्हाडूक केलं की,त्याचा जम्मूरे होऊन जातो.कारण सत्ताधिशाच्या हातात त्याचा दोर असतो.ही गुन्हेगारी जगतातील मटका चालवणाऱ्याची कथा.जो किंग आहे तो एका फंटरला गहाण ठेवून हे गैरकानूनी काम करून घेतो.ही काम सर्व शहरांमधील सामान्य दलित माणसं आहेत.पण ही शेवटच्या सांगण्यावरून 'गहाण' ठेवल्यामुळे गुमान काम करतात.अशी 'धोंडीबा काळुबा फाटके' यांची कथा.'भाकीत'सांगणारे खाकीत येऊन चकीत करणारे.खरात सारखे त्याकाळी अन् आताही.आमचा देश उच्चविद्याविभूषित झाला आहे.तरीही भाकीत आहे की,झाकीत आहे हे पितळ उघडं पडल्यावर कळते.परिवर्तनवादी चळवळ, तथागत गौतम बुद्धांची सहिष्णुता.बाबासाहेबांचे संविधान.आणि आजच्या समकालीन वास्तवाचे भाकीत काय?यात गौतम कांबळे या धडाडीच्या कथा नायकांने भाकीत केले आजचे विविध मागासवर्गीय यांनी बौद्ध धम्म स्विकारलाचं नाही पण ते सोयी सवलतीने अतिशय सुखात आहे.म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वहारा समाज व्यवस्थेच्या कल्याणासाठी हा कायदा काढला पण फायदा हे भाकीत घेऊन आला.हे असं होणारच आहे.एसी.ओबीसी,चे साक्षेपी कथानक म्हणजे ही कथा. 'दिशा बदलणारा वारा' या कथेतून तथागत भगवान गौतम बुद्धांचे विचार व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी कवी कथाकार किशोर घोरपडे."जेव्हा सम्राट अस्तित्वात येतो तेव्हा काय होते? तेव्हा सात भंडारे अस्तित्वात येतात.रथ, हत्ती,घोडे,रत्ने, स्त्रिया,शास्त, पिता आणि गादीचा वारसदार,ही सात.कुटुंबात मुलगी जन्मली तर त्या कुटुंबात दु:ख न मानता आनंद मानावा.ज्या कुटुंबाचा कारभार स्त्रियांच्या हातात देतात ती कुटूंबे विनाशापासून मुक्त होतात.स्त्री ही सात भांडारापैकी एक मोल्यवान भांडार आहे.तथागत बुद्ध स्त्रीयांना मोठ्या आदराने बघत"(पृ134) मुलींना गर्भात मारणारी ही आजच्या वर्तमानाची अस्वस्थ बेइमानी बंद करा.दिशा बदलणारा वारा म्हणजे लेकीचा जन्म.श्रध्देय किशोर घोरपडे यांच्या कथेचा आत्मा हा अत्यंत चिंतनशील प्रवृत्तीचा असल्याने मानवी जीवन सौख्याचा संदेश या कथा देऊन जातात.'चक्र'हे एका विशिष्ट रचनेतचं फिरत असते.चक्र हे वक्रतेने फिरता कामा नये.शिक्षण भरपूर घेऊन, मुलाखती अनेक देऊन ही,कोणतीच संस्था घेत नाही.कारण पैसा आणि वशिला नाही.तर तुमच्या गुणवत्तेला काहीचं किंमत नाही.या कथेतील राठोड आणि कांबळे या उच्चशिक्षित तरुणांची चक्रे गुन्हेगारी कडे कसे वाळतात व व्यसनाधीन होऊन या शिक्षण प्रणालीवर व या गाभडलेल्या व्यवस्थेवर ते भाष्य करतात.हे चक्र थांबले पाहिजे.या घसमटणीत लेखकानी अतिशय भावव्याकुळ करणारे संवाद आहेत.ही आंबेडकरी विचारांची वादळ कथा आहे.आजच्या सम्यक संबुध्दांच्या मध्यम मार्गाचा अवलंब केला पाहिजे म्हणून 'निळीवर सांडला गुलाल' ही शिवशक्ती ते भीमशक्ती या राजकिय अंगाने जाणारी कथा सत्ता, संपत्ती व पैसा,व बडेजावपणा मिरवण्यासाठी नाही तर दलितांनी सत्तेतराहिल्यावर आपल्या समाजातील वंचित बहुजन समाजाकडे जाणीवपूर्वक दक्ष होऊन लक्ष दिले पाहिजे हीठणक या कथेत आली आहे.या निळीवर सम्यक संबुध्दांच्या विचारांचा वेणू गगनावरी नेण्याची या निळाईची धम्मक आहे.पण कुणी गुलाल टाकून त्याला बटिक करत असेल तर तो खाटिक झाल्या शिवाय राहणार नाही.अशी ही कथा.तमाम परिवर्तनवादी विचारांना ही कथा स्मर्पित आहे.ख्यातनाम साहित्यिक डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर पाठराखण करताना लिहितात "भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्यभराच्या अथक प्रयत्नातून आणि वैचारिक प्रबोधनातून दलित समाज जागृत झाला.दलित चळवळ आणि दलित साहित्याच्या चळवळीमागे ही आंबेडकरी विचारांच्या प्रेरणेचा स्त्रोतच होता.आज जवळपास सर्वच सामाजिक आणि वैचारिक चळवळी थंडावल्या आहेत.अशा काळात आंबेडकरी समाजाला पुन्हा एकदा आत्मभान देण्याची गरज आहे.असे ज्या संवेदनशील आणि सृजनशील साहित्यिकांना वाटते; त्यापैकी किशोर घोरपडे हे एक महत्त्वाचे नाव आहे "(पाठराखण) या कथेतील आंबेडकरी विचारांचे अभिव्यक्तीचे अधिष्ठान अलौकिक आहे .कथेत तथागत सम्यक संबुध्दांच्या विचारांचा अथांग सागर आहे.

**घुसमटणी:-(कथासंग्रह)किशोर घोरपडे**
**प्रकाशिकि:-सौ उषा वासूदेव मुलाटे,**
**स्वरूप प्रकाशन प्रथमवृत्ती:-2006**



**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**